**राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या जवाहर / धडक सिंचन विहीर योजनेतील प्रगतीपथावरील पात्र लाभार्थांच्या विहिरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वर्ग करणे व उर्वरित विहीरींच्या अनुदानात वाढ करणेबाबत........**

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक — योजना-२०१३/प्र.क्र. १२३/रोहयो-५**
**मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२,**
दिनांक — २३ जानेवारी, २०१४.

**वाचा :-**

१. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - जविका-१२९८/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दिनांक १.७.१९९९.
२. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - जविका-२००२/प्र.क्र.६८/रोहयो-१०, दिनांक २४.५.२००२.
३. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-१०, दिनांक १५.१२.२००६.
४. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-५, दिनांक २१.५.२००७.
५. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२००७/प्र.क्र.१६६/रोहयो-५, दिनांक १७.११.२००७.
६. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२००७/प्र.क्र.१६६/रोहयो-५, दिनांक २४.३.२००८.
७. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२००७/प्र.क्र.१७९/रोहयो-१, दिनांक १०.४.२००८
८. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - जविका-२०००/प्र.क्र.१६६/रोहयो-५, दिनांक ११.८.२००८.
९. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - रोहयो-२००९/प्र.क्र.१६/रोहयो-५, दिनांक २३.१.२००९.
१०. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक -रोहयो-२००९/प्र.क्र.१६/रोहयो-५, दिनांक १६.२.२००९
११. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - जविका-२००८/प्र.क्र.१९०/रोहयो-५, दिनांक २९.५.२००९.
१२. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - रोहयो-२०११/प्र.क्र.१९६/रोहयो-५, दिनांक १४.११.२०११.
१३. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - विपआ-२०११/प्र.क्र.१९६/पुनर्बा.१७/रोहयो-५, दिनांक २०.९.२०१२.
१४. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - जविका-२०११/प्र.क्र.१७०/पुनर्बा.१६/रोहयो-५, दिनांक २९.१०.२०१२.
१५. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - जविका-२००९/प्र.क्र.२२/रोहयो-५, दिनांक २०.४.२०१३.
१६. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक - विपआ-२००९/प्र.क्र.३०८/पुनर्बा.५७/रोहयो-५, दिनांक १६.९.२०१३.
१७. शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक — भौतिक-२०१३/प्र.क्र.२९/रोहयो-५, दिनांक १६.९.२०१३.

**प्रस्तावना**

राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम -१९७७ च्या कलम -७ (२) (दहा) अन्वये राज्यात जवाहर विहीर योजना तसेच विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांमध्ये हीच योजना धडक सिंचन विहीर या नावाने अनुदान तत्वावर राबविण्यात येत आहे. या योजनेअंर्गत सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये एकूण ५१८०० जवाहर विहीरींचा लक्षांक ठरवून देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांसाठी सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये एकूण ८३२०० विहीरींचा लक्षांक ठरवून देण्यात आला आहे.

२. सन २००७-०८ व २००८-०९ मधील जवाहर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील देण्यात आलेल्या लक्षांकाच्या अनुषंगाने जुलै ते सप्टेंबर, २०१३ मध्ये आढावा घेण्यात आला. आढाव्याच्या दरम्यान प्रगतीपथावर असलेल्या जवाहर / धडक सिंचन विहीरींची माहिती सर्व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात आली. तद्नंतर सद्य:स्थितीत राज्यात अंदाजे ५८८३ जवाहर विहीरी व १८६३७ धडक सिंचन विहीरी अशा एकूण अंदाजे २४५२० विहीरी प्रगती पथावर आहेत. लाभार्थी निकषानुसार प्रगतीपथावरील विहीरींची जिल्हानिहाय आकडेवारी सोबतच्या **प्रपत्र-अ** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. त्यापैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच लहान व सिमांत शेतकरी या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांच्या प्रगतीपथावरील अंदाजे ११५२९ विहीरींची यादी **प्रपत्र-ब** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. सदर प्रपत्रातील दर्शविलेल्या लाभार्थ्यांच्या विहीरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र या योजनेअंतर्गत वर्ग करणे **तसेच प्रपत्र अ मधील स्तंभ ५** मध्ये दर्शविण्यात आलेल्या इतर लाभार्थ्यांच्या प्रगतीपथावरील अंदाजे १२९९१ जवाहर / धडक सिंचन विहीरी पूर्ण करण्यासाठी सध्या देय असलेले रू. एक लक्ष अनुदान अपुरे असल्याने या अनुदानात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय**

राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या जवाहर विहीर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच लहान व सिमांत शेतकरी या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांच्या प्रगतीपथावरील **प्रपत्र ब** मध्ये दर्शविलेल्या सुमारे ११५२९ विहीरी "जशा आहेत तशा" या तत्वावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र या योजनेत वर्ग करून पूर्ण करण्यात याव्यात. **याबाबतची मार्गदर्शक तत्वे स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.**

२) राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या जवाहर विहीर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील अपूर्ण असलेल्या व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र अंतर्गतच्या पात्रतेच्या अटींची पूर्तता करीत नसलेल्या **प्रपत्र-अ मधील स्तंभ क्रमांक ५** मध्ये दर्शविण्यात आलेल्या इतर लाभार्थ्यांच्या अंदाजे १२९९१ विहीरी पूर्ण करण्यासाठी सध्या देय असलेले रू. एक लक्ष अनुदान अपूरे असल्याने **या अनुदानात वाढ करण्यात येऊन सदर अनुदान रू. २.५० लक्ष ( रू. दोन लक्ष पन्नास हजार फक्त ) इतके करण्यात येत आहे. तथापि, या सर्व विहीरी ३० जून, २०१४ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक राहील.**

३) राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या जवाहर विहीर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत ज्या विहीरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे परंतू लाभार्थ्यांना कोणताही निधी वितरीत करण्यात आलेला नाही अशा सर्व विहीरी रद्द करण्यात येत आहेत. अशा लाभार्थ्यांना पात्र असल्यास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र अंतर्गत विहीरीसाठी अर्ज करण्यास मुभा राहील.

४) राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या जवाहर विहीर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गतच्या ज्या विहीरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व लाभार्थ्यांना अग्रीम देण्यात आले आहे परंतू लाभार्थ्यांनी अद्याप पर्यंत विहीरींची कामे सुरू केलेली नाहीत अशा सर्व लाभार्थ्यांच्या विहीरी पात्रतेनुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र योजनेत वर्ग करण्यात याव्यात व वर्ग करण्यास पात्र नसलेल्या लाभार्थ्यांच्या विहीरीची कामे पूर्ण करण्यासाठी रू. २.५० लक्ष (रू. दोन लक्ष पन्नास हजार ) पर्यन्त अनुदान देण्यात यावे. तथापि, ज्या लाभार्थ्यांना विहीरीची कामे करण्यात स्वारस्य नसेल अशा लाभार्थ्यांच्या विहीरी रद्द करण्यात याव्यात व त्यांच्याकडून देण्यात आलेल्या अग्रीमाची वसूली करण्यात यावी. विहीरी रद्द करण्याबाबतची कार्यवाही संदर्भाधीन अनु. क्रमांक १७ येथे नमूद केलेल्या शासन परिपत्रकानुसार करण्यात यावी.

५) राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी योजनेतील इतर लाभार्थी प्रवर्गातील प्रगतीपथावरील विहीरी पूर्ण करण्यासाठी इतर सर्व अटी व शर्ती उपरोक्त नमूद संदर्भाधीन शासन निर्णयानुसार राहतील.

६) रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या अपूर्ण असलेल्या ज्या विहिरींना रू. २.५० लक्ष अनुदान मंजूर करण्यात येईल अशा सर्व इतर लाभार्थ्यांच्या विहीरींचे मुल्यांकन करताना झालेल्या कामाचे मोजमाप करून सध्याच्या दरसूचीनुसार (DSR) मुल्यांकन निश्चित करण्यात यावे. तद्नंतर विहीरींची उर्वरित कामे सुरु केल्यानंतर कामाच्या प्रगतीनुसार, पूर्वी अदा करण्यात आलेली रक्कम वजा करून उर्वरित देय अनुदान लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने रुपये २.५० लक्ष च्या मर्यादेत वितरीत करण्यात यावे.

७) राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या जवाहर विहीर / धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या विहिरींची माहिती सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांनी सादर केल्यानुसार (प्रपत्र -अ ) २४५२० विहीरी इतकी दर्शविण्यात आली आहे. उपरोक्त नमूद कार्यवाही फक्त या विहीरींबाबत करण्यात यावी. यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येवू नये.

८) उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी यशस्वीपणे करण्याची जबाबदारी पूर्णपणे जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

९) याबाबत होणारा खर्च सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

१०) सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३३/१३/व्यय-८, दिनांक ७/१२/२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीने व मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्याच्या www.maharashtra.gov.in या वेब साईट वर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१४०१२३१३१४१७२५१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.**

वि. गिरिराज

**( वि. गिरिराज )**
**प्रधान सचिव(रोहयो), महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उपमुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव.
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

११ सर्व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद,
१२. मा. प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. मा. प्रधान सचिव (वित्त), यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सहायक संचालक(लेखा), कार्यासन -- रोहयो-७.
१७. निवडनस्ती, रोहयो-५.

## प्रपत्र अ

### लाभार्थी निकषानुसार प्रगतीपथावरील विहीरी

| जिल्हा | अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची संख्या | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची संख्या | लहान व सिमांत शेतकरी लाभार्थी संख्या | इतर लाभार्थी संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| ठाणे | ० | ० | ० | ० | ० |
| रायगड | ० | ० | ३१ | ० | ३१ |
| रत्नागिरी | २५ | ० | ६९ | ७२ | १६६ |
| सिंधुदूर्ग | ० | ० | ० | ० | ० |
| नाशिक | १५ | १५३ | ६८ | १७ | २५३ |
| धुळे | ४ | ५६ | ३४ | ९७ | १९१ |
| नंदूरबार | १ | ७५ | ३ | ५५ | १३४ |
| जळगांव | २२ | ३ | २३ | ८८ | १३६ |
| अहमदनगर | १८ | ५ | २८ | ४६ | ९७ |
| पुणे | ६ | ३८ | ९० | ३५ | १६९ |
| सातारा | २३ | ० | ५२ | ५६ | १३१ |
| सांगली | ५ | ० | २ | २४ | ३१ |
| सोलापूर | ३५ | ७ | ३५ | १०२ | १७९ |
| कोल्हापूर | ० | ० | ० | ० | ० |
| औरंगाबाद | २५ | १९ | ४४ | ३९ | १२७ |
| जालना | १११ | ६७ | ३४६ | ३१६ | ८४० |
| परभणी | ० | ० | ० | १ | १ |
| हिंगोली | ६ | ३ | १९ | २७ | ५५ |
| बीड | २७ | १ | ११२ | १२९ | २६९ |
| नांदेड | ८० | १३ | २४२ | २४२ | ५७७ |
| उस्मानाबाद | ११ | ० | ६० | २८ | ९९ |
| लातूर | ११ | ३ | १७ | ४४ | ७५ |
| बुलढाणा | ५७२ | १३२ | १८९८ | १४०४ | ४००६ |
| अकोला | २९८ | २१५ | ४४९ | ५५३ | १५१५ |
| वाशिम | १६२ | ३९ | ९ | ५४२ | ७५२ |
| अमरावती | ३९६ | ४०५ | ७८५ | ४०२९ | ५६१५ |
| यवतमाळ | ४७५ | ४४८ | ६०६ | ३५६२ | ५०९१ |
| वर्धा | २३३ | २३६ | ५९३ | ५९६ | १६५८ |
| नागपूर | ५२ | ६१ | २४६ | २२४ | ५८३ |
| भंडारा | १४ | ५ | ५८ | ९९ | १७६ |
| गोंदिया | ९१ | १३० | ४२९ | १८२ | ८३२ |
| चंद्रपूर | २८ | ४६ | २५८ | ३०० | ६३२ |
| गडचिरोली | ३ | ९ | ५ | ८२ | ९९ |
| एकूण | २७४९ | २१६९ | ६६११ | १२९९१ | २४५२० |

**प्रपत्र ब**

**लाभार्थी निकषानुसार अनुसूचीत जाती / अनु. जमाती / लहान व सिमांत शेतकरी यांच्या प्रगतीपथावरील मग्रारोहयोअंतर्गत वर्ग करण्याच्या विहीरी**

| जिल्हा | अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची संख्या | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची संख्या | लहान व सिमांत शेतकरी लाभार्थी संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| ठाणे | ० | ० | ० | ० |
| रायगड | ० | ० | ३१ | ३१ |
| रत्नागिरी | २५ | ० | ६९ | ९४ |
| सिंधुदूर्ग | ० | ० | ० | ० |
| नाशिक | १५ | १५३ | ६८ | २३६ |
| धुळे | ४ | ५६ | ३४ | ९४ |
| नंदूरबार | १ | ७५ | ३ | ७९ |
| जळगांव | २२ | ३ | २३ | ४८ |
| अहमदनगर | १८ | ५ | २८ | ५१ |
| पुणे | ६ | ३८ | ९० | १३४ |
| सातारा | २३ | ० | ५२ | ७५ |
| सांगली | ५ | ० | २ | ७ |
| सोलापूर | ३५ | ७ | ३५ | ७७ |
| कोल्हापूर | ० | ० | ० | ० |
| औरंगाबाद | २५ | १९ | ४४ | ८८ |
| जालना | १११ | ६७ | ३४६ | ५२४ |
| परभणी | ० | ० | ० | ० |
| हिंगोली | ६ | ३ | १९ | २८ |
| बीड | २७ | १ | ११२ | १४० |
| नांदेड | ८० | १३ | २४२ | ३३५ |
| उस्मानाबाद | ११ | ० | ६० | ७१ |
| लातूर | ११ | ३ | १७ | ३१ |
| बुलढाणा | ५७२ | १३२ | १८९८ | २६०२ |
| अकोला | २९८ | २१५ | ४४९ | ९६२ |
| वाशिम | १६२ | ३९ | ९ | २१० |
| अमरावती | ३९६ | ४०५ | ७८५ | १५८६ |
| यवतमाळ | ४७५ | ४४८ | ६०६ | १५२९ |
| वर्धा | २३३ | २३६ | ५९३ | १०६२ |
| नागपूर | ५२ | ६१ | २४६ | ३५९ |
| भंडारा | १४ | ५ | ५८ | ७७ |
| गोंदिया | ९१ | १३० | ४२९ | ६५० |
| चंद्रपूर | २८ | ४६ | २५८ | ३३२ |
| गडचिरोली | ३ | ९ | ५ | १७ |
| **एकूण** | २७४९ | २१६९ | ६६११ | ११५२९ |